ई-निविदा विक्री किंमत रुपये. ३,३००/-

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
शिर्डी ४२३ १०९ ता. राहाता. जि. अहमदनगर
दूरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००/२५८८००
फॅक्स क्रमांक (०२४२३) २५८८७०
वेबसाईट www.sai.org.in
ई मेल saidadar @ sai.org.in, publication @ sai.org.in
मुंबई कार्यालय पत्ता
'साई निकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड,
दादर मुंबई ४०० ०१४. टेलीफोन नं. ०२२-२४१६६५५६

**१०० पानी श्री साईलीलादसरा शताब्दी विशेषांक दादर, मुंबई कार्यालय व शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने-विभागासाठी श्री समाधी शताब्दी वर्ष उत्सव-२०१८करिता श्री साईलीला व्दैमासिके (सप्टेंबर-आक्टोबर-२०१८) छपाई करुनपुरवठा कामाची ई-निविदा**

निविदाकाराचे नावः-
संपुर्ण पत्ताः- --------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

---

(कार्यालयीन कामकाजाकरीता)

## निविदाकाराबाबत माहिती

१) फर्मचे नाव:-

२) पत्र व्यवहारासाठी संपुर्ण पत्ता:-

३) दुरध्वनी क्रंमाक / मोबाईल क्र.:-
ऑफिस :-
निवास :-
गोडावुन :-
फॅक्स :-
ई- मेल :-

४) संपर्कासाठी व्यक्तींचे नांव:-
दुरध्वनी क्रमांक –

५) मालकाचे/भागीदाराचे नावे - १)
२)

६) पॉवर ऑफ अॅटर्नी (असल्यास ) चे नाव –
पत्ता

६) आयकरनोंदणीपॅननंबर

८) निविदाकाराचे ब□क खाते क्र.

९) निविदाकाराचे ब□कचे नावः-

७) ब□क IFSC कोड क्र.

८) GST No.

## विषय:- निविदाधारकांसाठी आवश्यक सूचना

सदर निविदा भरतांना कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१) निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष व इतर अटी/शर्तींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२) निविदाधारकास रक्कम रुपये. ५५,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार मात्र ) बयाणा रक्कम म्हणुन निविदेसोबत भरावी लागेल.

३) निविदा फी व बयाणा रक्कम शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in वर भरावी.

४) पुर्ण माहिती भरलेली ई- निविदा मुदतीत सादर करावयाची जवाबदारी निविदाधारकांवर आहे.

५) कुठलीही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवला आहे. त्या बाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

६) सदर ई- निविदा दि. २०/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.३१/०८/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत WWW.mahatenders.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

७) प्रथम ऑनलाईनमध्ये सादर केलेल्या पुर्वपात्रते विषयक कागदपत्रांची पडताळणी/छाननी तांत्रिक बीड (Technical Bid) उघडून, त्यातील कागदपत्रे, निविदा फी व बयाणा रक्कम मागणी/ अटी-शर्ती प्रमाणे असल्यास व्यावसायिक बीड (Commercial Bid) उघडण्यात येईल.

८) ई-निविदेतील BOQ/Specification नुसार, श्री साईलीला व्दैमासिके छपाईकामाचे पेपरचे नमुने तांत्रिक बीड ज्या दिवशी उघडले जाईल, त्यावेळी निविदाकारांनी समक्ष सादर करावयाचे आहेत.

तांत्रिक बीड उघडणेबाबत सभेची दिनांक/वेळ व ठिकाण निविदाकारांना ई-मेल किंवा दुरध्वनीवरुन कळविण्यात येईल.

कळावे, श्री साईबाबांच्या शुभार्शिवादांसह.

(श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**निविदेच्या शर्ती/अटी**

१) प्रस्तावितछपाईचातपशिलपरिशिष्टातदिलेलाआहे. त्यातदरनमूदकरुनत्याखालीसहीशिक्यानिशीमूळनिविदाऑनलाईनभरावयाचीआहे.

२) हार्ड बॉन्ड पुस्तकांची किमान रू.पाच लाखाची छपाई कामे केलेली असणे आवश्यक आहे. तसेच छपाई व्यवसायाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे .

३) निविदाकाराने Technical Bid मधे दिलेल्या छपाई माहितीसंदर्भात संस्थानचे अधिकारी प्रसंगी आपले उद्योगाचे ठिकाणी भेट देऊ शकतील, त्यावेळी संबंधितांना सहकार्य करून आवश्यक ती माहीती देणे बंधनकारक राहील.

४) निविदाधारकाची मागील ०३ वर्षाची सरासरी वार्षीक उलाढाल किमान ५० लाख असणे आवश्यक आहे.(सन-२०१५-१६,२०१६-१७,२०१७-१८) त्याबाबतचे सी.ए.चे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

**५)** GST चे दरात भविष्यात बदल झाल्यास शासन आदेशाच्या दिनांकापासून त्यानुसार देयक सादर करावे लागेल.

६) यापुर्वी ज्या निविदाधारकांचे नाव संस्थानने काळया यादीत (Black List) टाकलेले आहे. अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७) निविदा फी रु.३,३००/- व बयाणा रक्कम रु.५५,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार मात्र ) थेट शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर भरावी लागेल.

८) एका व्यक्तीस वेगवेगळया फर्मच्या नावाने निविदा भरता येणार नाही. तसे आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

९) **छपाई कामाचे कागद, छपाई मजूरी, जकात, वाहतूक, पॅकींग व फॉरवडींग, व सर्व अनुज्ञेय कर (GST) या सर्व बाबींसह एकत्र दादर, मुंबई कार्यालय पोहचचे दर द्यावेत.** दर पुर्णांकीत असावे जसे (१.१०,१.२०,१.३०) दरपत्रकावर निविदाधारकाची सही व शिक्का असावा.

१०) परिशिष्टात नमूद केलेल्या कागदाशिवाय इतर कागदाचे दर देवू नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

११) निविदा पत्रासोबत भरलेल्या बयाणा रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही. आपले दरपत्रक नामंजूर झालेस ई-निविदा प्रक्रीयेतील पात्र निविदाधारकाचा पुरवठा आदेश ऑनलाईन अपलोड केलेनंतर अपात्र निविदाधारकांची **बयाणा रक्कम** परत करण्यात येईल. आपले दरपत्रक अंशत: मंजूर झालेस एकूण छपाई कामाचे ५% इतकी रक्कम **बयाणा रक्कमेतून** सुरक्षा अनामत खाते जमा करणेत येईल. आपली बयाणा रक्कम ५%सुरक्षा अनामत पेक्षा कमी असल्यास आवश्यक रक्कम संस्थानकडे रोखीने अथवा डी.डी. ने भरावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१२) छपाईकामी अग्रीम रक्कम ॲडव्हान्स दिली जाणार नाही.

१३) आपलेदरमान्यझालेचेछपाईकार्यादेशान्वयेआपणास कळविण्यात येईल. कार्यादेशातील शर्ती/अटी मान्य असल्याचे आपणास तीन दिवसाचे सात संस्थानला स्विकृती पत्र द्यावे लागेल, अन्यथा तसे न कळविलेस आपणास कार्यादेशातील शर्ती/अटी मान्य आहेत असे गृहीत धरणेत येईल. त्यानंतर आपली कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही. कार्यादेशाप्रमाणे काम करण्याचे नाकारल्यास आपली जमा सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून आपले नांव काळया यादीत टाकणेत येईल.

१४) एकदा दर सादर केल्यानंतर त्यामध्ये कारणास्तव भाववाढ देता येणार नाही.

१५) प्रेसधारकांनाछपाईकामीमजकुराचीसीडी/फोटोपुरविण्यातयेईल. त्यानुसारछपाईचेकामवडिझाईनिंगची सर्व कामे स्वखर्चाने करावयाची आहेत.

१६) कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

१७) ई-निविदाकराराच्याकालावधीतअगरतदनंतरपुढीलछपाईसंबंधीतप्रक्रियापुर्णहोईपर्यंतआवश्यक मंजूर केलेल्या छपाई परिणामापेक्षा २५% पर्यंत जादा छपाईची मागणी झाल्यास मंजूर दरानेच छपाईकरुन देणे निविदाकारांवर बंधनकारक

राहील.

१८) छपाईकामाचेदेयकसादरकरतांनादेयकातकार्यादेशातीलमजकूराप्रमाणेचतपशिलअसणेआवश्यक आहे. संक्षिप्त स्वरुपात तपशिलाचा उल्लेख करु नये, त्यामुळे देयक आदा करणेस विलंबझाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकांवर राहील.

१९) शासन नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात करण्यात येईल.

२०) ई-निविदा निकाल अधिसूचित करण्यात आल्यानंतर निविदाकारांना अथवा निविदा मंजूर झाल्याचेसंस्थानने आपणास कळविलेपासून १५ दिवसात प्रथम सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन वरु.६००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणेबंधनकारक राहील, त्यानंतर आपणांस कार्यादेश देण्यात येईल. याबाबत निविदाकाराने टाळाटाळ केल्यास, संस्थानकडून निकालाची अधिसूचना रद्द करण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

२१) कार्यादेश मान्य असल्याचे कळविलेनंतर आपणास मान्य दराने छपाईचे काम नियत वेळेत पुर्ण करुनद्यावे लागेल. नियतवेळेत मासिके छपाई करुन पुरवठा न केलेस एकूण मासिके छपाई रक्कमेवर**(पुरवठा न केलेल्या पुस्तकांच्या किंमतीवर )** २% दंडात्मक शुल्क आकारणी करुन वसूलकरण्यात येईल. आपणास सहा. संपादक, श्री साईलीला, दादर,मुंबई यांचे निर्देशानुसार काम करावे लागेल.

२२) कार्यादेशाप्रमाणे छपाई काम सुरु केलेनंतर प्रथम प्रुफ श्री साईलीला विभाग दादर, मुंबई कार्यालय येथूनतपासून घेऊन त्याबाबत संपादक यांचे पत्र प्राप्त झालेनंतर अंतीम छपाईचे काम सुरु करावे व अंतीम**प्रुफ तपासणीनंतर १५ दिवसात मासिके छपाई करुन पुरवठा करणे बंधनकारक आहे.**

२३) छपाईचे काम पुर्ण झाल्यावर संस्थानकडून छपाईकामी पुरविण्यात आलेली सीडी व्यवस्थीत पॅकींगकरुन संस्थानला परत करावयाची आहे.

२४) छपाईकामासाठी निविदेत नमूद केलेला कागद वापरावा व निविदेत नमूद कंपनीचा जीएसएमचाकागद प्रत्यक्षात वापरला आहे किंवा नाही याबाबत आवश्यकता भासल्यास याची पडताळणीशासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येईल. कागद कमी प्रतीचा आढळल्यास योग्य ती कायदेशीरकारवाई करणेत येईल. तोपर्यंत पुरवठा केलेल्या मालाची बिले आदा केली जाणार नाहीत.

२५) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा व जादा शर्ती व अटी विहीत करण्याचा अधिकारसंस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराची कोणतीही अट/शर्ती संस्थानवर बंधनकारकराहाणार नाही व अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२६) श्री साईलीला मासिकांची डिलेव्हरी स्विकारतांना ई-निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे आहे की नाही याचीतपासणी करण्यात येईल. मागणी प्रमाणे नसल्यास व्दैमासिकांची छपाई नसल्यास स्विकारले जाणार नाही वत्यास संबंधीत निविदाकार जबाबदार राहतील.

२७) ई-निविदेतील व्यावसायिक बीडामधील निम्नत्तम दरधारक निविदाकारांने (L-1) नमुन्याबरहुकूम व्दैमासिकेवेळेत छपाई करुन देण्यास टाळाटाळ केल्यास, विभागाच्या तात्काळ मागणीनुसार व्दैमासिके छपाई करुन वेळेतपुरवठा केला नसल्यास निविदाकाराची अनामत व देयके संस्थान खाती जमा (जप्त) करण्यात येईल.

**२८)** निविदेचा वैधता कालावधी ९० दिवसांचा राहील**.** (निविदा डाऊनलोड, तांत्रिक बीड व व्यावसायिक बीड उघडणे इ.)

२९) **निविदाकारांनी दरपत्रकात प्रती व्दैमासिक अ.नं.०७ नुसार सर्व करांसह संस्थानचे दादर, मुंबई कार्यालय पोहचचे दर द्यावेत.**

३०) छपाई करावयाचेव्दैमासिकांचे सर्व नमुने संस्थान कार्यालयातील दादर, मुंबई व प्रकाशने विभागात पहाणीकामी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. व्दैमासिकांचे नमुने पाहूनच ऑनलाईनमधील Bill of Quantities-(BOQ) भरावेत.

संस्थानकडील व्दैमासिकांचे नमुने हेच अंतिम नमुन्याबरहुकूम राहील. (BOQ) मधील पुस्तके नमुनाबरहुकूम (Printing of Books Specification) तपशिल हे फक्त निम्नत्तम दर / संख्येचा परिणाम भरणेसाठी आहेत. सबब व्दैमासिकांचे नमुना हेच अंतिम Specification राहील याची नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

३१) सदरीलव्यवहाराबाबतकाहीवादविवादउपस्थितझालेस, तो राहाता, कोपरगांव, अहमदनगर वमा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या कोर्टाचे न्याय कक्षेतच राहील.

३२) आपण संस्थानकडे बीले सादर करतांना पुर्वीचे बीलांसाठी शासनाकडे GST भरल्याचेInvoice Wise Summary सादर करणे बंधनकारक राहील, तसे नसल्यास आपले देयके (बीले) परत पाठविण्यात येतील.

३३) सदरची निविदा कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानव्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

(श्रीमती रूबल अग्रवाल,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

# प्रेस माहितीबाबतचे प्रमाणपत्र

१) प्रेसचा प्रचलीत भारतीय कायद्यानुसार नोंदणी क्र.
(Registration No.)

२) किती वर्षापासून व्यवसायात आहात ?

३) खाजगी मालकी किंवा कंपनी/ भागीदार ?
(कंपनी/भागीदार असल्यास डीड सोबत जोडावे.)

४) इमारत स्वमालकीची अगर भाडोत्री.

५) इमारतीचे क्षेत्रफळ.

६) उपलब्ध ऑफसेट मशीनरीचा तपशिल
(अ) दोन रंगात छपाई मशीन संख्या.
(ब) चार रंगात छपाई मशीन संख्या.

७) स्वत:ची सीटीपी/डीटीपी यंत्रणा आहे काय ?

८) स्वत:ची फोटो लॅमीनेशनची यंत्रणा आहे काय ?

९) स्वत:ची युव्ही यंत्रणा आहे काय ?

१०) स्वत:ची पुस्तके शिलाई यंत्रणा आहे काय ?

११) किती भाषेत छपाई केली जातेः-

वरील प्रमाणे प्रेसबाबतची सादर केलेली माहिती ही खरी आहे, संस्थानने प्रत्यक्ष पहाणी केल्यास वरील माहिती खोटी आढळून आल्यास त्यामुळे होणा-या संभाव्य कायदेशिर कारवाईस मी बांधील राहील.

आपला विश्वासू
सही / शिक्का

# (Technical Bid)

(ब) सोबत जोडावयाची कागदपत्रे

१) प्रेसनोंदणीप्रमाणप्रत्र / दाखला.

२) वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक
(GST No.)

३) पॅन कार्डची प्रत.

४) सनदी लेखापाल यांचे मागील ०३ आर्थिक वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र (सन-२०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८)

५) हार्ड बॉन्ड पुस्तकांची किमान पाच लाखाची छपाई कामे केलेल्या आदेशाची प्रत.

६) सरकारी, निमसरकारी संस्थांची कामे केली असलेबाबत कार्यादेशातील प्रत.

७) कोणत्याही संस्थेत मागील ०३ वर्षात काळया यादीत नाव समाविष्ठ नसलेबाबत शपथपत्र.

८) प्रेसच्या माहितीबाबतचे प्रमाणपत्र.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचेपत्र.**

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
ता. राहाता, जि. अहमदनगर

विषयः- १०० पानी श्री साईलीला दसरा शताब्दी विशेषांक दादर, मुंबई कार्यालय व शिर्डी कार्यालया-कडील प्रकाशने- विभागासाठी श्री समाधी शताब्दी वर्ष उत्सव-२०१८ करिता श्री साईलीला व्दैमासिके (सप्टेंबर-आक्टोबर-२०१८)छपाई करुन पुरवठा कामाची ई-निविदाबाबत..

महोदया,

खालील सही करणार मी/ आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेली ई-निविदा त्यातील शर्ती/ अटी मी/ आम्ही वाचल्या असून, त्या मला/आम्हाला मान्य आहेत. आपले शर्ती/अटींचे पालन करावयाचे मी/ आम्ही मान्य करीत आहे/ आहोत.

मी/आम्ही आपणास निविदेत नमूद केलेल्या छपाईचे काम जे नमुनाबरहुकूम आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधी करता संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दादर, मुंबई कार्यालय येथे पोहोच करण्याची हमी देतो. वेळप्रसंगी नमूद केलेल्या परिणामापेक्षा २५%पर्यंत जास्त छपाईची मागणी संस्थानतर्फे झाल्यास, मी/ आम्ही मंजूर दराने पुरविण्याची हमी देत आहे/ आहोत

नियमाप्रमाणे निविदा फी रु.३,३००/- (अक्षरी रुपये तीन हजार तिनशे मात्र) व बयाणा रक्कम रु.५५,०००/- (अक्षरी रुपये पच्चावन्न हजार मात्र.) दि. / /२०१८ रोजी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन जमा केलेली आहे.

ज्या छपाईकामाची आमची निविदा मंजूर होईल. त्या मंजूर दराने होणा-या किंमतीचे ५% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजूर झाल्याचे कळविलेपासून १५ दिवसाचे आत मी/ आम्ही रोख अथवा डी.डी. ने भरणा करु. तसेच रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत छपाईचा पुरवठा नियतवेळेत संस्थानचे मध्यवर्ती भांडार विभागात पोहच करणे आमच्यावर बंधनकारक राहील.

आपला विश्वासू

सही/ सह्या व शिक्का

फर्मचे / मालकाचे भागीदाराचे नावः-

| १) | २) | ३) |
| --- | --- | --- |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**मुशिर्डी .पो ., ताराहाता ., जिल्हाअहमदनगर -, पिन४२३१०९ -**
**फोन .२५८८००/२५८८०८/२५८५०० (०२४२३) .नं .फॅक्स क्रं२५८७७०-**
(Website- www.sai.org.in) E-mail- publication@sai.org.in

## ईनिविदा सुचना -

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईलीला कार्यालय दादर, मुंबई व शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने विभागासाठीश्री समाधी शताब्दी उत्सव-२०१८ निमित्त दसरा शताब्दी विशेषांक १०० पानांचा श्री साईलीला व्दैमासिक नियतकालिक छपाई करुन पुरवठा करणेकामीचे ऑनलाईन निविदा मुद्रणालयाकडुन मागविण्यात येत आहेत.

- निविदाकिंमतरु.३,३००/- (रु. तीन हजार तिनशे मात्र.)
- बयाणारक्कमरु. ५५,०००/- (रु.पंचावन्न हजार मात्र.)
- मागील ०३ आर्थिक वर्षात उलाढाल किमान रु. ५० लाख असावी व छपाई व्यवसायाचा किमान ०३ वर्षाचाअनुभव आवश्यक.

१) ई निविदे बाबतच्या अटी व शर्ती -निविदा व ई -www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
२) निविदा ऑनलाईन डाऊनलोड व अपलोडींगसाठी दि.२०/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.३१/०८/२०१८ सायं.५०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
३) निविदा फी व बयाणा रक्कम थेट www.mahatenders.gov.inया शासनाच्या संकेतस्थळावर भरावयाची आहे.
४) निविदाकाराने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.
५) श्री साईलिला अंक छपाईकामाचा नमुना शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. कृपया नमुना पाहुनच ई-निविदा भराव्यात.
६) शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.०३/०९/२०१८ रोजी उघडण्यात येतील.
( कोणतीही निविदा अंशतः /पूर्णपणे स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.)

**(श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**